# LPT TEST : RBI ASSISTANT 2021

संध्याकाळी आम्ही लागोलेतला गाजाबाच्या गावी गेलो. तिथली घर अगदी समुद्राच्या कुशीत शिरून हारीन निवांत पडलेली होती. तिथे लहान मोठ्या होड्या,वल्ही, मासे पकडायची जाळी नी अशीच मच्छिमारीच साहित्य होत. रत्नागिरीतल्या भाटे राजीवाड्याची आठवण होत होती. त्या घरात एक घर आपल्या वैशिष्ट्याने सर्वांचे लक्ष वेधून घेत होतं. त्या घराच्या दर्शनी भागाला भलं मोठ्ठ काचेचं तावदान होतं नी त्याच्या आत विविध आकाराच्या शंख शिंपल्याचं भव्य भंडार...

त्या शंख शिंपल्यात नजर इतकी गुंतली की चालतांना ठेच लागून अंगठा मुरगळ्लयाचंही लक्षात आलं नाही. तेवढयात हलू हलू चाला---हलू हलू चाला ... अस म्हणत एक बाई पटकन बाहेर आली. उंच, शिमशिडित, निंमगोऱ्या रंगाची, कपाळावर ठसठशीत कुंकू, गळ्यात सोन्याचं मंगळसूत्र, सोन्याच्या बांगड्या, कुड्या... ती गजाबाई होती. पदराआड गेलेलं गळ्यातलं मंगळसूत्र पदरावर काढत गजाबाई बोलत होती. उत्सुकतेनं आपुलकीनं आमची विचारपूस करत होती. शंखशिंपल्यांची ती सागरी श्रीमंती कौतुकानं दाखवत होती.

गजाबाई दुकानात काचेच्या मोठ्या कपाटांमधून नुसत्या शंखांचेच तीनशे प्रकार होते. चक्री शंख, कळी शंख, जांभूळ खाऊन दात रंगवल्या सारखे फेरे असलेले जांभूळ शंख, लांब पाय पसरलेले कोळी, हळदी, देवळी गदा, कट्यारी, मुगुटी शंख काही पांढरे शुभ्र पुनव काही झेबऱ्यासारखे पट्टे असेलेले तर काही गोकर्णींच्या फुलं सारखे वगैरे.

शिवाय शिंपल्यांचेही कित्येक प्रकार... कौल, स्वाती, पायटी, काटेरी, सोनकरंडी असे अगदी नखापासून ते ओंजळी इतके मोठेही होते.त्यातच अधून मधून ठेवलेली काटेरी कोरल्सची पांढरीशुभ्र फुलं अगदी वेड लावत होती.

कपाटांच्या तळभागात साळींद्रासारख्या माशांची तशीच काटेरी भोपळासारखी गोल कातडी नी शार्क माशाच्या तोंडाची काही हातोडीसारखी तर काही करवतीसारखी लांब हाडं तलवारीसारखी उभी ठेवलेली होती.

तिथल्यासारखे शंख शिंपले माशाची सुकवलेली तोंड शेपट्या कवच बाजूच्या काही घरांमधूनही होती. ती सागरी संपत्ती, तिथल्या होड्या, नांगर बघून वाटलं हि माणसं कोळी किंवा भंडारी समाजाची असावी. गजाबाई म्हणाली आम्ही मूळचे चव्हाण. मराठी आहोत. इथे आडनाव लावत नाय. पतीचं नाव आंबोजी. तो उसाच्या शेतात काम करतो. त्याचा पैसे त्यालाच (दारूला) लागतो. घर मी चालवतो. पोरं आता मोठी झाली. शिकली ती मला धंद्याला हात देतात. शंख शिंपल्यांकडे बोट दाखवून गजाबाई म्हणाली. हे समद आम्ही पाण्यात जाऊन आणायचा. आता आमाला नाय गावत. लय आत दर्यात जावं लागत. म्हणून आत जाऊन आणणाऱ्याकडन विकत घेतो. साफसूफ करतो. तासतो. रंग लावतो. लय मेहनत असते. पैसे चांगला मिळतो.

आपल्या मेहनतीबाबत अभिमानानं सांगत गजाबाई आम्हाला पाठच्या दारी घेऊन गेली. पाठीमागे अथांग समुद्र पसरला होता नी लता चंदेरी वाळूतून खळाखळ गजाबाईच्या घरापर्यन्त झुळझुळत होत्या. त्यावर तांबूस पिवळ्या मावळत्या रंगछटा घेऊन आकाश ओथंबलं होतं नी पूर्वेकडे तितक्याच उत्कटतेनं एका निळ्या सावळ्या ढगाआडून इंद्रधनुष्याच्या हळुवार गोफ उमटला होता.

ते सारं पाहतांना बालकवींच्या इंद्रधनुच्या दुहेरी गोफाची आठवण होत होती. मॉरिशसच्या मंगल गीतातील

विविध रंग हे जमिनीचे नंदनवन हे अवनीचे
स्वप्न रंगले सत्यात इंद्रधनूची वरती कमान
देश आमचा स्वर्गसमान

या वर्णनाची प्रचिती येत होती. त्या स्वप्नमय दृश्यात आम्ही रंगलो असतानाचं गजाबाई म्हणाली, इथं परदेशी मांप येतात त्यांच्या साठी लोकं हॉटेल बांधतात लय पैसा मिळतो. चार - चार पाच-पाच वर्षात लोकांनी झोपडी मोडून बंगले बांधले माजा पयला काय नव्हता. आता मी नवा घर बांधला. आता मी आणखी वर मजला उठवलाय. तिथं मी हॉटेल करीन... चला दावतो असं म्हणून गजाबाई वळली तेव्हा तिच्या चेहऱ्यावर सुंदर इंद्रधनुष्य उमटलं होतं.

प्रश्न १ ला: उताऱ्याचा आधारे खालील विधाने पूर्ण करा (गुण १०)

१) रत्नागिरीतल्या ......... राजवाड्याची आठवण होत होती

२) शंखशिंपल्याची ती सागरी श्रीमंती .........

३) त्यातच अधून मधून ठेवलेली काटेरी कोरल्स ........ अगदी वेड लावत होती.

४) सुरवातीला ......... मेहनत असते. पैसा चांगला मिळतो.

५) हे सारं पाहतांना ....... दुहेरी गोफाची आठवण होत होती

प्रश्न २ रा : उताऱ्याचा आधारे विधान चूक कि बरोबर ते लिहा. (गुण १०)

१) तिथली घर अगदी समुद्राच्या कुशीत शिरून हारीन निवांत पडलेली होती.

२) पदराआड गेलेलं गळ्यातलं मंगळसूत्र पदरावर काढत गजाबाई बोलत होती. उत्सुकतेनं आपुलकीनं आमची विचारपूस करत नव्हती.

३) गजाबाईच्या दुकानात काचेची मोठमोठी कपाटे रिकामी होती.

४) शंख शिंपल्यांकडे बोट दाखवून गजाबाई म्हणाली. हे समद आम्ही पाण्यात जाऊन आणायचा. आता आमाला नाय गावत.

५) . पाठीमागे अथांग समुद्र पसरला होता नी लता चंदेरी वाळूतून गजाबाईच्या घराला नेस्तनाबूत करत होत्या.

प्रश्न ३रा : गटात न बसणार शब्द ओळखा (गुण १०)

१) सागर, समुद्र, दर्या, नाला.

२) चक्री शंख, जांभूळ शंख, कळी शंख, हातोडा शंख

३) पळस, गोकनी, जाळी, बोगन

४) शार्क, सुरमई, पापलेट,ऑक्टोपस

५) निरुती, अवनी, धरती, वसुंधरा,पृथ्वी

प्रश्न ४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. (गुण १०)

१) अथांग

२) प्रचिती

३) समुद्र

४) भंडार

५) मालमत्ता

प्रश्न ५. खालील शब्दांचे विरोधार्थी शब्द लिहा (गुण १०)

१) श्रीमंती

२) अवजड

३) उंच

४) उत्सुक

५) पांढरा

प्रश्न ६. खालील शब्दांचे अनेक वचन लिहा. ( गुण १० )

१. साहित्य
२. शंख
३. मासा
४. फुल
५. शिंपला.

प्रश्न ७ वा. खालील वाक्यप्रचारांचा वाक्यात उपयोग करा (गुण १०)

१) कुशीत शिरणे
२) शंख करणे
३) प्रचिती येणे
४) इंद्रधनुष्य उमटणे
५) वेड लावणे

प्रश्न ८ वा. पुढील उतारा मराठीत भाषांतरीत करा (गुण १०)

Student of women in early Indian history have tended to focus on what is broadly termed as the ‘ status of women ‘, which is turn has led to a concentration of attention on a limited set of question such as marriage low, property rights and rights relation to religious practices, normally viewed as indices of status.

प्रश्न ९ वा. खालील संख्या अक्षरात लिहा. (गुण १०)

१) २९३७८६
२) ३९ × ५५ - २१४५
३) ६३९ - २५८ = ४३५
४) ७०३ +१६३ = ८६६
५) ६२५ ÷ १२५ = ५

प्रश्न १० वा. खालील वाक्ये शुद्ध करून लिहा (गुण १०)

१) मि गावाला जावून येतो.
२) काल सीनेमा लागला.
३) नीयमीत अभ्यास ते करतो.
४) बँक बंद नाहि.
५) खालि जपून उतारा.